**प्रेसनोट दि.०३/०३/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर**

**लवासा सिटी,मुळशी पुणे येथील १२०० एकरजागेवर प्रोजेक्ट उभा करण्यासाठी १०० कोटीचे कर्ज देण्याच्या नावाखाली ५५ लाखाची फसवणूक करणा-या भामटयाला मुंबईतून शिताफीने अटक**

ग्लोबल इन्फ्रा. ॲन्ड फायनान्शिअल या कंपनीचे माध्यमातून लवासा सिटी,मुळशी पुणे येथील १२०० एकर जागेवर लवासा सारखाच प्रोजेक्ट बनविण्यासाठी १०० कोटी रू चे कर्ज आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था तसेच खाजगी गुंतवणूकदाराकडून अल्प व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देतो तसेच सदरचा प्रोजेक्ट ५५००० कोटी रू ला विकत घेतो असे अमिष दाखवून वेळोवेळी वेगवेगळया मिटींग घेवून तसेच कर्ज मंजूरी प्रक्रिये संदर्भात वेळोवेळी बनावट मेल व एसएमएस पाठवून फिर्यादीस आश्वासन देवून फिर्यादीकडून ५५ लाख रू घेवून फिर्यादीस कोणतेही कर्ज प्रकरण मंजूर करून न देता फिर्यादीची फसवणूक करून केलेबाबत फिर्यादी पृथ्वीराज खामकर,रा.तावरे कॉलनी,पर्वती पुणे यांनी इसम नामे जतिन विरेंद्र धुर्व व जयेश नंदलालभाई गुंचाला याचे विरूध्द दत्तवाडी पोलीस ठाणेस सन २०१६ मध्ये गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचा तपास दत्तवाडी पोलीस ठाणेकडील सहा.पोलीस निरीक्षक शंकर सलगर हे करीत होते.गुन्हयाचे तपासामध्ये इसम नामे जतिन धुर्व यांने तो ग्लोबल इन्फ्रा. ॲन्ड फायनान्शिअल या कंपनीचा सीईओ असल्याचे भासवून तक्रारदार यांना सदर कंपनी मार्फत पाठविलेले ईमेल्स,एसएमएस व तक्रारदाराशी वेळोवेळी केलेले करारनामे पुरावा म्हणून ताब्यात घेण्यात आले होते.सदर पुराव्याचे बारकाईने अवलोकन करता आरेपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यासाठी मोठया प्रमाणात ईमेल व एसएमएस तसेच फोनव्दारे संपर्क केला असल्याचे निष्पन्न झाले.तसेच फिर्यादी सोबत वेळोवेळी मिटींग घेवून तसेच लवासा सिटी,मुळशी पुणे येथे भेट देवून तेथील १२०० एकर जागेवर लवासा सिटीसारखाच प्रोजेक्ट बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था तसेच खाजगी गुंतवणूकदाराकडून अल्प व्याजदरात १०० कोटी रू कर्ज उपलब्ध करून देतो व सदरचा प्रोजेक्ट जतिन धुर्व याची ग्लोबलइन्फ्रा. ॲन्ड फायनान्शिअल ही कंपनी५५००० कोटी रू ला विकत घेईन असे फिर्यादीस अमिष दाखविले होते.सदर कर्ज मिळवून देण्यासाठी परदेशी दौरे व मोठमोठया वित्तीय संस्था यांचेशी मिटींग व इतर कामासाठी खर्च म्हणून फिर्यादीकडून वेळोवेळी ५५ लाख रू उकळून फिर्यादीचे कोणतेही कर्ज प्रकरण न करता पोबारा केला असल्याचे निष्पन्न झाले.

सदरचा आरोपी अत्यंत धुर्त,चाणाक्ष व बोलण्यात हुशार असल्याने तो गेले २ वर्षापासून पोलीसांना गुंगारा देत होता.आरोपी जतिन धुर्व कांदीवली,मुंबई येथे त्याची ओळख लपवून राहत असलेबाबत गोपनिय बातमी मिळाली होती.त्या अनुषंगाने त्याचेवर गेले १५ दिवसापासून गुप्त पाळत ठेवली होती.त्यास त्याचे मागावर असलेबाबतचा सुगावा लागू नये म्हणून खबरदारी घेण्यात आली होती.आरोपी जतीन धुर्व याचे राहते ठिकाण,त्याचे घरात राहणा-या व्यक्ती,तो नोकरी करीत असलेले ठिकाण,त्याची कामावर जाण्याची व येण्याच्या वेळा व इतर इत्यंभुत माहिती गोळा करून दि.१/३/२०१९ रोजी १६ः३० वा तो काम करीत असलेल्या **रिर्सजंन्ट इंटीग्रेटस प्रा.लि.,कॅथरिन अपार्टमेंट,चॅपल रोड,बांद्रा (प),मुंबई** येथून त्यास शिताफीने ताब्यात घेवून त्याचेकडे तपास करतात्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे येथे आणून नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.सदरचा आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून अधिकतपास चालू आहे.

सदरची कारवाई मा. श्री मंगेश शिंदे - पोलीस उप-आयुक्त साो.,परिमंडळ – ३, श्री.बाजीराव मोहिते-सहा. पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.देवीदास घेवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र सहाणे-पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शंकर सलगर,सहा.पोलीस निरीक्षक,श्री भारत आस्मर,पोलीस शिपाई दत्तवाडी पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.